# हसरत जयपुरी - भाग १



आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत हसरत जयपुरी जुहू येथे एका आलिशान पांढऱ्या शुभ्र बंगल्यात बायको बिल्कीस, मुलगा अख्तर, सून अझरा आणि नातू आदिल यांच्यासह रहात होते. 'गझल व्हिला' हा मायेची ऊब देणारा आणि आल्यागेल्यांचे दोन्ही हातांनी स्वागत करणारा असा बंगला होता. सर्वांना असं वाटण्याचं कारण म्हणजे ह्या घरातील माणसं केवळ आलेल्या पाहुण्यांवरच नव्हे, तर एकमेकांवरही मायेचा वर्षाव करीत. एकमेकांची आपुलकीने काळजी घेत.

ह्या गीतकारचे निधन होण्यापूर्वी काही दिवस आधी त्यांना भेटण्याचे मला भाग्य लाभले. मी जेव्हा त्यांना भेटलो तेव्हा ते आजारीच होते. त्यांचा बिछाना खिडकीजवळ होता. हसरत साहेब कुर्ता पायजमा अशा सुटसुटीत पोषाखात होते. त्यांचा मुलगा अख्तर त्यांची दाढी करत होता. त्यांनी आरसा मागितला. एकदम उसळून ते सुनेला म्हणाले, "अगं बघ, ह्याने माझी दाढी चांगली नाही केली."

ते मूत्रपिंडाच्या विकाराने आजारी होते आणि त्यांची दोन्ही मूत्रपिंडे अंशत: काम करीत होती. पडल्यामुळे त्यांना प्रचंड पाठदुखीचा त्रास जाणवत होता आणि आजार बळावून फुफ्फुसावर कफामुळे पॅचही आला होता. त्यामुळे ते कुणालाही भेटत नसत आणि मुलाखत तर मुळीच देत नसत. परंतु कसं कुणाला माहित, पण मी त्यांच्याकडे गेलो त्या दिवशी त्यांची तब्येत बरीच चांगली वाटत होती. बराच वेळ ते बसूनच गप्पा मारत होते. आपल्या कुटुंबियांना ते मला कुठली कुठली पत्रे, लेख, कागद वगैरे दाखवायला सांगत होते. एकदा तर कुणाच्याही मदतीशिवाय ते टॉयलेटलाही जाऊन आले. गेल्या कित्येक महिन्यांत आजच ते इतके बरे आहेत असं त्यांची पत्नी मला म्हणाली. त्या दिवशी ते इतक्या आनंदी मूडमध्ये होते की माझ्या काही प्रश्नांची उत्तरे त्यांनी मी ते विचारण्यापूर्वीच दिली.

इक्बाल हुसेन (हसरत जयपुरी यांचे खरे नाव) यांचा जन्म जयपूर येथे १५ एप्रिल १९२२ रोजी झाला. त्यांच्या आईचे वडील फिदा हुसेन फिदा हे एक नामवंत कवी होते आणि त्यांच्या ह्या नातवाने त्यांच्याकडूनच हा गुण घेतला असावा. तरुणपणात सुंदर मुलींवर त्यांचे लक्ष असे आणि बहुधा त्यामुळेच चित्रपटांतील काही अतिशय सुरेख अशी प्रणयरम्य गीते त्यांनी लिहिली. त्यांच्या शेजारच्या

राधा नावाच्या मुलीवर त्यांचे प्रथम प्रेम बसले. तिला उद्देशून त्यांनी एक कविता लिहिली. तेव्हा त्यांचे वय वीस असेल. ती कविता इतकी सुंदर होती की ती मुलगी त्यांच्यावर फिदा झाली. परंतु खरे फिदा म्हणजे त्यांचे आजोबा यांचे त्यांच्या वर बारीक लक्ष होते. त्यांनी हसरत यांना लेखनासाठी प्रोत्साहन दिले आणि सांगितले की खूप लिही पण कविता अशीच साधी, सोपी आणि सहज समजणारी लिही.

त्यानंतर हा युवक १९४५ मध्ये कामाच्या शोधात मुंबईला आला. त्याने मिळतील ती बारीक-सारीक कामे केली आणि अखेर मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन (BEST) मध्ये त्यांना बस कंडक्टर म्हणून नोकरी मिळाली. परंतु त्यांनी काव्य लेखन सुरूच ठेवले आणि मुशायरा, कंपनीच्या युनियनची स्नेहसंमेलने, इ. ठिकाणी काव्यवाचनाचे कार्यक्रम केले. सुंदर मुलींवर त्यांचा डोळा होताच आणि बसमध्ये चढणाऱ्या सुंदर मुलींवर ते गीते लिहू लागले त्यामुळे अर्थातच त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. ह्याच सुमारास राज कपूर आपल्या 'बरसात' ह्या चित्रपटाची जुळवाजुळव करीत होता. तो नव्या गुणी लोकांचा शोध घेत असताना कुणीतरी या आगळ्यावेगळ्या कवीबद्दल सांगितले. ते दोघे भेटले आणि त्यांचं एकमेकांशी जमून गेलं. हसरत यांचं 'जिया बेकरार है' हे पहिलं गाणं ध्वनिमुद्रित झालं. या गीतकाराची कारकीर्द खूप वेगात चढ्या आलेखाने बहरत गेली.

(क्रमश:)

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com